# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार
यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व,
जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेस नोट क्र. ४४८/२०२३ दिनांक ३०/१२/२०२३

**गावठी हातभट्टीची दारु बनविण्याऱ्या व विक्री करण्याऱ्या इसमास गावठी हातभट्टीची दारु बनविणाऱ्या साहित्यासह ताब्यात घेण्यास अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर पथकास यश.**

दि. २९.१२.२०२३ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर यांना काशिमिरा पोलीस ठाणे हद्दीतील माश्याचा पाडा, काशिगाव येथील इसम नामे अशोक सावरे व जयश्री राहुल अम्बात, रा. माश्याचा पाडा, समाज मंदीराजवळ, काशिगाव, काशिमिरा हे त्यांचे राहते घराचे पाठीमागील मोकळया जागेत गावठी हातभटटीची दारु स्वत: बनवुन विक्री करतात अशी बातमी मिळाली आहे.

मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने कायदेशी बाबींची पुर्तता करुन आमचे मार्गदर्शन व सुचनाप्रमाणे सफौ/उमेश पाटील यांनी दोन पंचसह १७.१५ वा. छापा टाकला असता, इसम नामे अशोक लाडक्या सावरे, रा. माश्याचा पाडा, समाज मंदीराजवळ, काशिगाव, काशिमिरा व पाहिजे आरोपी महिला जयश्री राहुल अम्बात असे मिळुन त्यांचे घराचे पाठीमागील मोकळया जागेत कॅन व ड्रममध्ये एकुण १६५ लिटर गावठी हातभटटीची दारु १३,२००/- रु किंमतीची, दारुच्या वासाचा ०१ प्लॉस्टीक मग, ०२ पारदर्शक प्लास्टीक पिशव्याचे बंडल तसेच गावठी हातभट्टी दारु बनविण्याचे साहित्य त्यामध्ये ॲल्युमिनयमचे सतेले, पत्र्याचा ड्रम, प्लॉस्टीक गाळणी, रबरी टयुब, नवसागर व ड्रिग्री मापक व रोख रक्कम असे एकूण १५,३६०/- रु किंमतीचा माल व गावठी हातभट्टीची बनविण्याचे साहित्य जवळ बाळगुन गावठी हातभट्टीची दारु विक्री करीत असतांना मिळुन आल्याने त्यास मुद्देमालासह ताब्यात घेतले. ताब्यातील इसम नामे अशोक लाडक्या व पाहिजे आरोपी महिला नामे जयश्री अम्बात रा. सदर यांच्याविरुध्द पोशि/केशव शिंदे यांनी सरकार तर्फे फिर्याद दिल्याने काशिमिरा पोलीस ठाणे गुन्हा रजि.क्र. ८५६/२०२३, महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५ (फ) (ई) प्रमाणे दि.३०.१२.२०२३ रोजी दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई मा. श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), मा. श्री. मदन बल्लाळ, सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे) मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोनि.समीर अहिरराव, सफौ/उमेश पाटील, पोहवा/किशोर पाटील, पोशि/केशव शिंदे, चा.पोहवा/सम्राट गावडे, मपोशि/अश्विनी भिलारे सर्व नेम.अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर यांनी केली आहे.